# एडिसन मराठी शाळेची माहिती

एडिसन मराठी शाळेचं मूलभूत ध्येय म्हणजे मुलांना मराठीमधून संवाद साधता येणे. आत्तापर्यंतच्या आमच्या अनुभवाला अनुसरून ही अपेक्षा सगळ्या मुलांकडून ठेवणं गैरवाजवी आहे. त्यामुळे शाळेच्या सगळ्यात वरच्या वर्गातून उत्तीर्ण होताना त्यांना निदान मराठी सहजपणे आणि न अडखळता वाचता आणि लिहिता यावं अशी आमची माफक अपेक्षा आहे, किंबहुना तो आपल्या शाळेचा मुख्य उद्देश आहे.

शाळेत बी एम एम** च्या परीक्षा देण्यात येतात आणि त्या अभ्यासक्रमावर आधारित शाळेच्या वर्गांची विभागणी करण्यात आली आहे. बी एम एम च्या एकूण ५ परीक्षा आहेत व आपल्या मराठी शाळेच्या प्रत्येक दोन वर्षांनतर विद्यार्थी यातील एकेक परीक्षा घेण्यासाठी तयार होतील असे आम्हांला वाटते. मराठी चांगले येण्यासाठी उत्तम पायाभरणी व्हावी ह्या हेतूने शाळेच्या सुरुवातीच्या वर्गांना दोन वर्षात विभागले आहे.

आपल्या शाळेत सर्वसाधारणपणे सगळीच मुलं **बालवाडी-पहिलीच्या** वर्गापासून सुरूवात करतात. बालवाडी-पहिलीमध्ये प्रवेश मिळण्याकरता ते मूल किमान सहा वर्षांचे असणे आवश्यक आहे. त्यासाठी मुलांना अक्षरओळख असण्याची आवश्यकता नाही परंतु त्यांना सोपे मराठी संभाषण समजावे, अशी आमची अपेक्षा आहे. त्यासाठी पालकांनी घरात मुलांशी मराठीतून बोलावे अशी आमची विनंती आहे.

यापुढील **किलबिल-पहिलीच्या** वर्गात जाताना मुलांना मुळाक्षरे आणि रोजच्या वापरातील शब्द येणे अपेक्षित आहे की जेणेकरून मुले काही प्रमाणात तरी मराठीत संवाद साधू शकतील. या वर्षाच्या अखेरीपर्यंत मुलांना या गोष्टींवर प्रभुत्व मिळवून सहज मराठीत जोडाक्षरविरहित शब्दांचे वाचन करणे, इंग्रजी - मराठी शब्द भाषांतर करता येणे हे अपॆक्षित आहे. या वर्गाच्या अखेरीस <u>मुलांची योग्य तयारी असल्यास</u> मुले बी एम एम च्या अभ्यासक्रमावर आधारित पहिली परीक्षा देऊ शकतील.

यानंतरचा **किलबिल-दुसरीचा** वर्ग शाळेच्या दोन वर्षात विभागलेला आहे. या किलबिल-दुसरीच्या वर्गात जाण्यासाठी मुलांना मुळाक्षरे, बाराखडी आणि मराठीत वाचन अपेक्षित आहे. या वर्गात त्यांची जोडाक्षरांशी ओळख करून देण्यात येते. जोडाक्षरे वापरून तयार केलेल्या शब्दांचा त्यांच्याकडून सराव केला जातो.

किलबिल-दुसरीच्या वर्गाच्या दुसऱ्या वर्षात वरील सगळे शब्द वापरून लिहिलेले उतारे वाचायची सवय केली जाते. या वर्गाच्या अखेरीला मुलांना जोडाक्षरे वापरून लिहिलेले छोटे उतारे सहजपणे किंवा थोडसं अडखळत वाचता येणे अपेक्षित आहे. या वर्गाच्या अखेरीस <u>मुलांची योग्य तयारी असल्यास</u> मुले बी एम एम च्या अभ्यासक्रमावर आधारित दुसरी परीक्षा देऊ शकतील.

यापुढील म्हणजे **किशोर-तिसरीच्या** वर्गात मुलांकडून उतारे वाचण्याचा खूप सराव करून घेण्यात येतो. या वर्गात मुलांना दिलेले मराठी उतारे वाचणे, भाषांतर करणे इ. अपेक्षित आहे. महाराष्ट्राचा माफक इतिहास,भूगोल,प्रसिद्ध व्यक्ती इ.ची तोंडओळख करून देण्यात येते. या वर्गाच्या अखेरीस <u>मुलांची योग्य तयारी असल्यास</u> मुले बी एम एम च्या अभ्यासक्रमावर आधारित तिसरी परीक्षा देऊ शकतील.

किलबिल-दुसरी आणि किशोर-तिसरीच्या वर्गांमध्ये विद्यार्थ्यांनी शक्यतो मराठीतून बोलावे अशी आमची अपेक्षा आहे.

यापुढील म्हणजे **किशोर-चौथीच्या** वर्गात जाणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याला मराठीतून संभाषण करता येत असल्याची आमची अपेक्षा आहे. ते गृहीत धरूनच या वर्गाचा अभ्यासक्रम ठरवण्यात आला आहे. या वर्गाच्या अखेरीस मुलांची योग्य तयारी असल्यास मुले बी एम एम च्या अभ्यासक्रमावर आधारित चौथी परीक्षा देऊ शकतील.

बी एम एम च्या पाचव्या परीक्षेत आपल्या शाळेतील काही विद्यार्थी यापूर्वी उत्तीर्ण झाले आहेत. परंतु या परीक्षेचा अभ्यासक्रम बऱ्याच अंशी कठीण असल्यामुळे यापुढे आम्ही ती परीक्षा अपवादानेच घ्यायचं ठरवलं आहे. **बी एम एम ने अगदी अलीकडे जाहीर केलेल्या एका नवीन उपक्रमाबद्दलची माहिती सर्वात शेवटच्या पानावर जरूर वाचा.**

ही माहिती अगदी माफक प्रमाणात एका आढाव्याच्या स्वरुपात आम्ही तुम्हाला देत आहोत. या सगळ्या वर्गांमध्ये इतर बऱ्याच गोष्टी शिकवल्या जातात. बी एम एम च्या सगळ्या परीक्षांचा अभ्यासक्रम आम्ही तुम्हाला योग्य वेळी पुरवणार आहोत.

**** - बी एम एम (BMM)** म्हणजे बृहन महाराष्ट्र मंडळ. अमेरिकेतील सगळ्या मराठी मंडळांनी एकत्र येऊन ही संस्था प्रस्थपित केली आहे. काही वर्षांपूर्वी या मंडळातील काही उत्साही कार्यकर्त्यांनी अमेरिकेतील सगळ्या मराठी शाळांबरोबर चर्चा करून, पुण्यातील भारती विद्यापिठाची मान्यता असलेला एक अभ्यासक्रम तयार केला. वर नमूद केलेल्या परीक्षा याच विद्यापीठाच्या सहकार्याने तयार केल्या जातात.

# <u>EDISON MARATHI SHALLA RULES AND REGULATIONS</u>

1) Orientation/ Information Session is mandatory for all the new parents. Returning students and parents are free to attend or skip it.
2) Please make sure your child arrives five minutes before the start of the class hour and not later than five minutes after the class has started.
3) Parents should be present five minutes prior to the class dismissal time to pick up their children. Please follow all parking rules of the JCC.
4) Parents should avoid crowding in the JCC foyer and restrain their children from running or playing on the JCC premises.
5) Every student is expected to attend at least 2/3$^{rd}$ of all the classes to receive any credit for the year. There are approximately 29 to 31 sessions each year. It will be up to the class teacher's discretion to allow those students who do not attend the minimum number of classes from attending either the internal Shalla exam and/or the BMM exam.
6) Similarly taking the BMM exams and promotions to the next level of our Shalla will be completely up to the class teacher's discretion. The teacher's decision will be final.
7) Please check the Shalla Facebook page for any weather related or urgent Shalla updates. An email may follow for any cancellation news.

## <u>FEES</u>

**Online registration ONLY –** Please submit a completed Shalla registration/ admission form that has been posted online on our Shalla website or emailed to new and registered parents.

**FEE TO BE PAID IN CASH ONLY –** The Shalla fee amount will be announced within a week of opening. Please pay the appropriate fees by the end of the second week**.**

*<u>As you may appreciate, this is a voluntary endeavor. The fee charged is used to pay the rental fee for our classes at the JCC and the two annual events of the school – Diwali Party and Summer Picnic.</u>*

## CLASS ETIQUETTE (VERY IMPORTANT)

1) Every student should carry a notebook, 2-3 sharpened pencils, and erasers to each class.
2) The notebook should bear the student's full name.
3) Ensure your child carries home his/ her school material after each class.